महाराष्ट्र शासन
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अमरावती**
ई-मेल:-gmcamravati@gmail.com

जा.क्र.शावैमहाअ/बांधकाम/ OC3 /२६ दि. १९ .०१.२०२६

# पाणीटाकी साफ सफाई स्वच्छता करिता
# जाहिर ई-दरपत्रक सूचना

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती करिता या संस्थेत उपलब्ध असलेल्या पाणी टाकी साफ सफाई पुरवठादार नियुक्त करण्या करिता व त्यांचे दर १८० दिवसाच्या कालावधी करिता दर निश्चित करुन ठेवण्याकरिता इच्छुक पुरवठादारांकडुन एकल दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदर कालावधी दरनिश्चिती पत्र निघाल्याच्या दिवसापासुन १८० दिवसांकरिता राहील.

दरपत्रक अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांचे नावे सादर करावयाचे असुन दरपत्रकाच्या लिफाफ्यावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकरिता आवश्यक असलेल्या पाणी टाकी साफ सफाई स्वच्छता करण्याकरिता दरपत्रक असे स्पष्ट नमुद करण्यात यावे. स्वत:चे नाव व पत्ता लिहावा अशा प्रकारे तयार करण्यात आलेले दरपत्रक दि.29/01/२०२६ रोजी सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत कार्यालयात आणून देण्यात यावे.

प्रापत होणाऱ्या दरपत्रकातील लिफाफे दि.30/01 / २०२६ रोजी दु. १२:०० वाजता अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांच्या दालणामध्ये उघडण्यात येईल. इच्छुक पुरवठादारास सदर सभेस उपस्थित राहता येईल.

जिथे दर द्यावयाचे नाही तिथे इच्छुक नाही असे स्पष्ट नमुद करावे. ती जागा रिकामी सोडण्यात येवू नये. सर्व दर हे एका नगाकरिता सर्व कर समाविष्ट करुन नमुद करावे. अपुर्ण माहितीसह प्राप्त होणारी दरपत्रक नाकारण्याचा अधिकारी अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे. तसेच यादी मधील काही बाबी किंवा मागविण्यात येणाऱ्या संपुर्ण दरपत्रकाची प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकारी अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे.

दर हे पेनने लिहीन्यात येऊ नये ते प्रिंट केलेले असावे. हस्ताक्षरात लिहिलेले दरपत्रक रद्द करण्यात येईल. दरनिश्चिती झाल्यावर आवश्यकतेनुसार वेळोवेळी आदेश काढण्यात येईल. आदेश प्राप्त होताच १० दिवसांत आदेशातील काम करणे बंधनकारक राहील. न्युनतम ठरणाऱ्या पुरवठादारास नमुद विनिदिष्टांप्रमाणे सदर काम करणे बंधनकारक राहील.

स्वच्छतेचे कामकाज करतांना कामकरणाऱ्याने मास्क, ग्लोज, मोजे इत्यादी सुरक्षा साधनांचा वापर करणे अनिवार्य राहिल. काम करणाऱ्यास सदर काम करतांना दुखापत किंवा इजा झाल्यास त्याची जबाबदारी पुरवठार यांची राहील. यासंस्थेकडे त्याबाबत दाद मागता येणार नाही.

लिफाफ्यामध्ये आवश्यक कागदपत्रे जसे की, दुकान नोंदणी प्रमाणपत्र (Shop Act), जीएसटी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, आधार कार्ड, उद्यम प्रमाणपत्र यांच्या छायांकित प्रती असणे अनिवार्य राहील. नसल्यास आपले दरपत्रक रद्द समजण्यात येईल.

सदर दरपत्रकासंबधी आपणास काही तक्रार या कार्यालयास दाखल करावयाची असल्यास प्रथम आपण या कार्यालयात तक्रार संबधी रु. १०,०००/- शासन खाती जमा करावे लागेल. जर आपण दाखल केलैल्या तक्रारीत या कार्यालयास काही तथ्य आढळून आल्यास आपणास आपण शासन खाती जमा केलेली रु. १०,०००/- रक्कम परत करण्यात येईल. तक्रारीमध्ये काही तथ्य न आढळल्यास रु. १०,०००/- रक्कम परत करता येणार नाही व ती रक्कम शासन खाती जमा करण्यात येईल.

NRaut 19.1.2026
( डॉ.एन.जी.राऊत )
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती

Amravati

| अ.क्र. | तपशील | पाणी टाकी क्षमता | दर (जीएसटीसह) |
|---|---|---|---|
| 01 | पाण्याची प्लास्टीक टाकी रिकामी करुन धुणे, गन मशीन व व्हॅकुम क्लीन करणे, अ‍ॅन्टी बॅक्टेरीयल ट्रिटमेंट, क्षार काढणे, डाग काढणे. | 500 लिटर | |
| 02 | | 1000 लिटर | |
| 03 | | 2000 लिटर | |
| 04 | | 5000 लिटर | |
| 05 | अंडग्राऊड सिमेंट कॉंक्रीट पाण्याची टाकी रिकामी करुन धुणे, गन मशीन व व्हॅकुम क्लीन करणे, अ‍ॅन्टी बॅक्टेरीयल ट्रिटमेंट, क्षार काढणे, डाग काढणे | प्रति घण फुट दर नमूद करावा | |

NRaut 19.1.2026

(Dr. Nandkishor V. Raut)
Dean
Government Medical College,
Amravati